# फ्लॉरेन्स नाइटिंगेल, वेडरबर्न आणि गोखले

ष्ट्रीय सभेच्या आद्यप्रवर्तकांच्या आणि समर्थकांच्या परस्परांमधील संबंधावर नवीन माहितीच्या आधारे टाकलेला प्रकाश )

लेखक : मु. गो. देशपांडे

V2wM66
M5
211849

मूल्य : रुपये बारा

wM66
M5
1849

परिमृघा प्रकाशन, नाशिक-२

कॉंग्रेस शताब्दीच्या निमित्ताने प्रकाशित करण्यात आलेली संशोधनपर पुस्तिका

# फ्लॉरेन्स नाइटिंगेल, वेडरबर्न आणि गोखले

लेखक : मु. गो. देशपांडे

परिमृघा प्रकाशन

पहिली आवृत्ती
डिसेंबर १९८५

•

© लेखकाधीन

•

प्रकाशक :
**सौ. मंगला देशपांडे**
परिमृघा प्रकाशन
रमानिवास, गोळे कॉलनी,
नाशिक–४२२ ००२.

•

मुद्रक :
**तुषार अंधूटकर**
अक्षरचित्र
नाशिक औद्योगिक सहकारी वसाहत,
सातपूर, नाशिक ४२२ ००७.

# निवेदन आणि ऋणनिर्देश

'गोखले-नवदर्शन' असा एक ग्रंथ गोखले पत्रव्यवहाराच्या आधाराने आणि स्वतंत्रपणाने केलेल्या वाचनाच्या आधाराने काही निरनिराळ्या लेखांचे एकत्रीकरण करून प्रकाशित करण्याच्या प्रयत्नात गेली काही वर्षे मी गुंतलेलो आहे. या लेखांपैकी दोन लेख हे भारतीय राष्ट्रीय सभेच्या शताब्दीनिमित्त एका पुस्तिकेच्या रूपाने मी आज प्रकाशित करीत आहे.

'गोखले पत्रव्यवहार' फार विस्तीर्ण आणि गोखले व त्यांचा कालखंड यांचा अभ्यास करणाऱ्याला अत्यंत मोलाचा असा खजिना आहे. या मौल्यवान ठेव्याचा उपयोग मराठी चरित्रकारांनी मुळीच केलेला नाही व इंग्रजीत गोखले चरित्र लिहिणाऱ्यांनीही अत्यंत मर्यादित स्वरूपात केलेला आहे. गोखल्यांना अनेक महाराष्ट्रीय मंडळींनी लिहिलेली पत्रे, भारतातील इतर थोर स्त्रीपुरुषांनी लिहिलेली पत्रे, परदेशातील प्रामुख्याने इंग्लंडमधील मित्रमंडळींनी लिहिलेली पत्रे यांचा अभ्यास केल्यास कितीतरी माहिती नव्यानेच उजेडात येणारी आहे. माझ्या उरलेल्या लेखातून ती मला जसजशी उपलब्ध झालेली आहे ती मी विवेचनाच्या ओघात उपयोगात आणली आहे. त्याचप्रमाणे एका स्वतंत्र प्रकरणात अशी वेगवेगळ्या लोकांकडून गोखल्यांना आलेली बरीचशी पत्रे एकामागून एक मी भाषांतरित केलेली आहेत. या पुस्तिकेच्या बरोबरच तीही मी पुस्तिकेचा आकार मोठा करून देऊ शकलो असतो तर अतिशय समाधानकारक अशी ती गोष्ट झाली असती. परंतु काँग्रेस शताब्दीच्या सुमारास एवढा मजकूर त्वरेने छापून होणे अवघड झाल्यामुळे ते प्रकरण इतर प्रकरणाप्रमाणेच मी मागे ठेवले आहे परंतु या पत्रांची थोडीशी ओळख व्हावी म्हणून काही पत्र लेखकांची नांवे देतो. १) लाला लजपतराय, २) विठ्ठल रामजी शिंदे, ३) लाला मुन्शीराम ऊर्फ

स्वामी श्रद्धानंद, ४) कुमारस्वामी, ५) सी. एफ्. ॲण्ड्रूयूज, ६) रवींद्रनाथ टागोर, ७) प्रिन्सिपल सेल्वी, ८) व्हँकूव्हर येथील शीखसमाजाचे अध्यक्ष, ९) मृणालिनी सेन, १०) कोल्हापूरचे राशींगकर, ११) इचलकरंजीचे चीफ १२) सी. रामलिंग रेड्डी, १३) एच. ए. एल. फिशर, १४) लॉर्ड केन्स, १५) सिडने वेब, १६) वामनराव कोल्हटकर १७) सयाजीराव गायकवाड, १८) एस. के. रॅटक्लिफ.... आणखी अनेकांची नावे मी देऊ शकेन. या सर्वांनी गोखल्यांना लिहिलेली पत्रे मी भाषांतरित केलेली आहेत व ते प्रकरण अत्यंत नवीन असेच होणार आहे.

हे शक्य होण्याच्या कामी अत्यंत महत्वाची मदत अर्थातच National Archives New Delhi या केंद्र सरकारच्या सुरक्षित दप्तरी आता सुपूर्त केलेल्या गोखले पत्रव्यवहारामुळे झाली. त्यांच्या कृपेने या Xerox टंकलिखित प्रती मला उपलब्ध झाल्या. त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे. कागदपत्रांचा कॉपीराईट केंद्र सरकारकडे आहे. त्यांनी हे धन मला उपलब्ध करून दिले. त्यांची परवानगी अध्याहृत धरून ही पुस्तिका प्रकाशित केली आहे. नाशिकच्या गोखले एज्युकेशन सोसायटीने या झेरॉक्स व टंकलिखित प्रती मिळविण्यासाठी लागणारे द्रव्यसहाय्य मला अगत्याने दिले याबद्दल National Archives New Dehli व गो. ए. सो. चे कार्यवाह, प्राचार्य मो. स. गोसावी यांचा मी आभारी आहे.

मु. गो. देशपांडे